विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत विद्यार्थ्यांची मतदार यादीमध्ये नाव नोंदणी करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

शासन परिपत्रक क्रमांक.एमईडी १०२२/प्र.क्र.३२५/२२/शिक्षण-२

वैद्यकीय शिक्षण व औषधीद्रव्ये विभाग,

गो.ते.रुग्णालयाची नवीन इमारत, ९ वा मजला, गो.ते. रुग्णालय संकुल,

लोकमान्य टिळक मार्ग, नवीन मंत्रालय,मुंबई ४०० ००१

दिनांक:- १९/१०/२०२२

संदर्भ:- १. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. २३/२०२२-ERS (Vol.II), दि.२५.०७,२०२२.

२. भारत निवडणूक आयोगाचे पत्र क्र. ४९१ /ECI/LET/FUNC/SVEEP-II/Vol/ SSR/२०२२, दि.२८.०७.२०२२.

३. अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी यांचे अर्धशासकीय पत्र क्र. संकीर्ण-२०२२/प्र.क्र.५७५/२२/३३, दिनांक ०८ सप्टेंबर, २०२२.

४. शासन पत्र क्र.एमईडी-१०२२/सं.क्र.१३४०/शि-२, दिनांक २०/०९/२०२२.

## परिपत्रक

भारत निवडणूक आयोगाकडून दरवर्षी विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत अस्तित्वात असलेल्या मतदार यादीची पडताळणी व दूरुस्ती करून ती त्रुटी विरहीत करण्याचा व दि. १ जानेवारी या अर्हता दिनांकानुसार नविन मतदार नाव नोंदणी करुन मतदार यादी सुधारित करण्याचा कार्यक्रम राबविण्यात येतो. विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम २०२३ मध्ये दि. १ जानेवारी, २०२३ रोजी १८ वर्ष पूर्ण करणारे नवमतदार यांची नोंदणी करून मतदार यादी सुधारीत करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. तसेच सन २०२३ पासून दरवर्षी १ जानेवारी, ०१ एप्रिल, ०१ जुलै व ०१ ऑक्टोंबर अशा चार अर्हता दिनांकानुसार वा त्यापूर्वी १८ वर्ष पूर्ण होणाऱ्या नागरीकांना मतदार यादीमध्ये आगाऊ नाव नोंदणी करता येणार आहे. सदर विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत दि.०९.११.२०२२ रोजी राज्यातील सर्व विधानसभा मतदारसंघातील प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहेत व दि.०९.११.२०२२ ते दि.०८.१२.२०२२ या कालावधीत दावे व हरकती स्विकारण्यात येणार आहेत. दि.०१ ऑक्टोंबर, २०२३ या दिनांकापर्यंत १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या नवयुवकांना मतदार नाव नोंदणीसाठी (दि.०९.११.२०२२ नंतर) आगाऊ अर्ज सादर करता येणार आहेत.

२. विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम, २०२३ अंतर्गत महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, अभिमत विद्यापीठे, एम्स (AIIMS) येथील सर्व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे महाविद्यालय मधील विद्यार्थ्यांची मतदार यादीमध्ये मतदार म्हणून नाव नोंदणी करण्याचा उपक्रम राबविण्याबाबतची विनंती अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून करण्यात आली आहे.

३. मतदार यादीच्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमाच्या अनुषंगाने महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, अभिमत विद्यापीठे, एम्स (AIIMS) येथील सर्व आरोग्य विज्ञान अभ्यासक्रमांचे महाविद्यालय यांनी खालील उपक्रम करण्यात यावेत:-

१. विद्यापीठ व त्याअंतर्गत येणाऱ्या महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना निवडणूक साक्षरता मंडळामार्फत विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम, २०२३ या कार्यक्रमांची माहिती देण्यात यावी.

२. निवडणूक साक्षरता मंडळामार्फत दि.०९.११.२०२२ ते दि.०८.१२.२०२२ या कालावधीत दिनांक ०१.०१.२०२३ रोजी १८ वर्ष वय पूर्ण होत असलेल्या विद्यार्थ्यांची नवीन मतदार म्हणून नोंदणी अर्ज भरुन घेण्यात यावेत. तसेच ज्या विद्यार्थ्यांचे दिनांक ०१.१०.२०२३ पर्यंत १८ वर्ष वय पुर्ण होणार आहे अशांकडून ही नविन मतदार नोंदणीसाठी आगाऊ अर्ज भरून घेण्यात यावेत.

३. राष्ट्रीय सेवा योजना (NSS) व नेहरु युवा केंद्र (NYK) यांच्याशी समन्वय साधून विद्यार्थ्यांची नाव नोंदणी करण्यात यावी.

४. ऑनलाईन माध्यमामार्फत नविन मतदार नोंदणीबाबत विविध उपक्रम राबविण्यात यावे. निवडणूक साक्षरता बूट कॅम्प, विविध ऑनलाईन स्पर्धा असे विविध उपक्रम राबवून जनजागृती करण्यात यावी.

५. विद्यापीठ व महाविद्यालयांमध्ये नविन मतदार नोंदणीबाबत ऑनलाईन प्रश्न मंजुषा स्पर्धा आयोजित करुन जनजागृती करण्यात यावी.

६. विद्यापीठ/महाविद्यालय कार्यालयाने संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालय/तहसिल कार्यालयाकडून आवश्यक अर्जाच्या फॉर्मचे नमुने उपलब्ध करुन घ्यावेत. विद्यार्थ्यांना विहित नाव नोंदणी अर्ज विद्यापीठ / महाविद्यालयांमध्ये उपलब्ध करून द्यावेत. विद्यार्थ्यांकडून प्राप्त होणाऱ्या नाव नोंदणींच्या अर्जाचे संकलन करून विद्यापीठ/महाविद्यालयाने संबंधित मतदार नोंदणी अधिकारी कार्यालयाकडे पाठवावे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२२१०१९१३०७५६१६१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

AJIT TUKARAM SASULKAR

Digitally signed by AJIT TUKARAM SASULKAR
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=MEDICAL EDUCATION AND DRUGS DEPARTMENT, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=09df106c443b4977e7463338fa58f736fdb4fe137863b178345a5ead34dbfb12, pseudonym=8433B0910FFD44AC77C267452786D497C8BC73E0, serialNumber=71214F99804ABAAE1EA28D5F794C1BA337889880D0C567C29D025934340956DF, cn=AJIT TUKARAM SASULKAR
Date: 2022.10.19 15:20:25 +05'30'

(अजित सासुलकर)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव
२. मा. अपर मुख्य सचिव तथा मुख्य निवडणूक अधिकारी, मंत्रालय, मुंबई
३. जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी (सर्व)
४. कुलगुरू, सर्व विद्यापीठे
५. संचालक, उच्च शिक्षण, पुणे
६. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
७. संचालक, आयुष संचालनालय, मुंबई
८. संचालक, वैद्यकीय शिक्षण व प्रमुख रूग्णालये (बृहन्मुंबई महानगरपालिका)
९. संचालक, प्राध्यापक, महाराष्ट्र मानसिक आरोग्य संस्था, पुणे
१०. संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रूषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई
११. सहसंचालक (वैद्यकीय), वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, मुंबई
१२. कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक
१३. निवड नस्ती.